सरकार तर्फे साक्षीदार क्र.८ यांची जबानी

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,

माझे नांव - मारुती दत्तु पाटील

वय-६६ व्यवसाय – सेवानिवृत्त एएसआय सांगली शहर पोलिस ठाणे

रा -कर्नाळ ता.मिरज जि.सांगली

**सरतपासणी सरकार तर्फे सहा. सरकारी अभियोक्ता श्रीमती डी.बी.पाटील**

१. सन २०१२ मध्ये मी विश्रामबाग पोलिस ठाणेत सहा.पोलिस फौजदार म्हणुन कार्यरत होतो. दि.२२-१-२०१२ रोजी मला गु.र.क्र.७/२०१२ चा तपास बलवडी व कोळेगाव गावी जावुन करणेचा आदेश लेखी मिळाला होता. आता दाखविलेला आदेश तोच असुन त्यावर शरद जांभले पोलिस निरीक्षक विश्रामाबाग पोलिस ठाणे यांची सही आहे. ती मी ओळखतो. त्याला निशाणी क्र.१२८ दिली.

२. दि.२३-१-२०१२ रोजी बलवडी हायस्कुल येथे गेलो. त्यावेळी मुख्याध्यापक गायकवाड हे सीक रजेवर असल्याचे सांगीतले. त्या हायस्कुलमधील शिक्षक व इतर कर्मचारी हजर होते. त्यांचे जबाब मी नोंदविले. त्यामध्ये सुभाष जनार्दन शिंदे, शिवाजी कृष्णा शिंदे, चंद्रकांत भिमराव मोहिते, कासलिंग नाना पुजारी, राजेंद्र भोजा सावंत, हिरालाल अहमद शेख यांचे जबाब नोंदविले. त्यांनी मला "शालेय शिक्षण पोषण आहाराचे धान्य एका वर्गात होते. त्यावेळी सुरेश गायकवाड हा टेंपो घेवुन आला. शालेय शिक्षण पोषण आहाराचा तांदुळ पॉलिस करायचा आहे असे सांगुन सुरेश गायकवाड हा तांदुळ घेवुन गेला. तो बरेच दिवस परत आला नाही त्यामुळे पेपरबाजी झाली व त्यावरुन त्यांना समजले." असे सांगीतले. त्याप्रमाणे मी त्यांचे जबाब नोंदविले.

३. दि.२-२-२०१२ रोजी पो.नि.विश्रामबाग यांनी बलवडी, कोळेगाव व शेटफळे या गावी जावुन आरोपी आनंदा माने व शत्रुघ्न गायकवाड यांचा शोध घ्या. आता मला दाखविलेला आदेश तोच असुन त्यावर पो.निरीक्षक यांची स्वाक्षरी आहे. त्याला निशाणी क्र.१२९ दिली. त्यानंतर मी कोळेगाव गावी गेलो. मी तेथे बाळासाहेब देशमुख, विलास आलदर, संभाजी पांढरे, राजाराम पांढरे, पांडुरंग कोळेकर, निवृत्ती कचरे, दशरथ अलदर यांचे जबाब नोंदविले. त्या

साक्षीदारांनी त्यांना दारिद्रय रेषेखालील कार्डवर किती तांदुळ मिळतो हे सांगीतले. मी आरोपींचा शोध घेतला परंतु आरोपी मिळुन आले नाहीत. मी आरोपींना पाहिलेले होते. त्यापैकी मिणचे, गायकवाड, माने यांना मी ओळखतो. ते आज न्यायालयात हजर आहेत. या गुन्हयाचा तपास हवालदार कोळी, पोलिस निरीक्षक जांभळे यांनी केला आहे. माझे तपासामध्ये शालेय पोषण आहाराचा तांदुळ सांगली मार्केटयार्डमध्ये मिणचे यांचे दुकानात विकला जात होता व तो तांदुळ बलवडी हायस्कुलमधील होता असे मला दिसुन आले.

**उलटतपास आरोपी क्र.१,३ तर्फे विधिज्ञ श्री. यु.व्ही.लोखंडे वकील**

४. हे म्हणणे खरे आहे की, नि.१२८ व १२९ चे पत्रामध्ये शालेय पोषण आहाराचा तांदुळ सांगली येथे विकलेला आहे व त्याचा तपास मला करायचा आहे असा उल्लेख नाही. हे म्हणणे खरे आहे की, कोळेगावातील रेशन दुकानामधील तांदुळ जप्त झाला आहे असा उल्लेख नाही. हे म्हणणे खरे आहे की, बलवडी व कोळेगाव ही गावे तालुका सांगोला जिल्हा सोलापुर यांचे हद्दीतील आहेत. हे म्हणणे खरे आहे की, शेटफळे हे गाव तालुका आटपाडी जिल्हा सांगली या हद्दतील आहेत. बलवडी हायस्कुलमध्ये रजेवर असणा-या मुख्याध्यापकाचा कार्यभार कोणावर आहे याची चौकशी केली नाही किंवा तसा जबाब घेतला नाही. हे म्हणणे खरे नाही की, रजेवर असणारे मुख्याध्यापक गायकवाड यांच्यावर आमचे पोलिस ठाणेत गुन्हा दाखल झाला होता. साक्षीदार स्वतः सांगतो की तसे तपासामध्ये निष्पन्न झाले होते. हे म्हणणे खरे आहे की, नि.१२८ व १२९ वरील आदेशानुसार मला बलवडी हायस्कुलचे मुख्याध्यापक व कोळेगावातील रेशन दुकानदार आनंदा माने हे मिळुन येतात का कसे याचा तपास करुन अहवाल सादर करावा असे आदेश होते. हे मला आठवत नाही की, मला तपासावेळी या दोन्ही आरोपींनी जिल्हा न्यायालयात अटकपुर्व जामीनाचा अर्ज केला आहे असे दिसुन आले. हे म्हणणे खरे आहे की, मी माझे तपासात बलवडी हायस्कुलमधील शालेय पोषण आहाराचे तांदुळ या संबंधीचे रजिस्टर हजर केलेले नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी बलवडी हायस्कुलला तांदुळ किती मिळाला व किती खर्च झाला याबाबतचा अहवाल सादर केलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी बलवडी हायस्कुलमध्ये किती पोती तांदुळ होता व किती पोती बाहेर गेला याचा अहवाल दिलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी माझे तपासात आनंदा माने यांचे रेशन दुकानात स्टॉक तपासणी, रजिस्टर तपासणी केलेली नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी माझे तपासात सांगली मार्केट यार्डात बलवडी हायस्कुल किंवा

कोळेगावातील आनंदा माने यांच्या रेशन दुकानातील तांदुळ सापडला असा कागदोपत्री पुरावा सादर केलेला नाही.

**उलटतपास आरोपी क्र.२,४ तर्फे विधिज्ञ श्री.ए.एम.पटेल वकील**

५. हे म्हणणे खरे आहे की, नि.१२८ व १२९ मध्ये कोळेगावातील आनंदा माने यांच्या रेशन दुकानाबाबत तपास करणेचा आदेश होता. मी ३-२-२०१२ रोजी कोळेगावात आनंदा माने याचे रेशन दुकानाबाबत तपास केला होता. मी आनंदा माने हा रेशन दुकान चालवितो किंवा नाही याबाबत जाबजबाब घेतले नाहीत. हे म्हणणे खरे आहे की, आप्पा आनंदा माने या रेशन दुकानाविरुध्द कोणत्याही कार्डधारकाने माझेकडे तक्रार नोंदविली नाही. हे म्हणणे खरे नाही की, आप्पा आनंदा माने यांचा गुन्हयाशी सबंध नसताना मला आनंदा माने यांचेबाबत तपासाचे आदेश असताना मी आप्पा आनंदा माने यांचे विरुध्द खोटी चौकशी केली. हे म्हणणे खरे आहे की, पोलिस निरीक्षक जांभळे यांनी मला आप्पा आनंदा माने याचे संबंधी तपासाचा आदेश दिलेला नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, मी मुद्दमहुन आप्पा आनंदा माने यांचेकडे चौकशी केली.

**उलटतपास आरोपी क्र.५ तर्फे विधिज्ञ श्री.बी.आर.जिगजेनी वकील**

आरोपी क्र.१ ते ४ साठी घेतलेला उलटतपास मान्य केला.

उलटतपास पूर्ण. फेरतपास नाही.

श्रवणोत्तर निवेदन स्विकृत

सही/-

सांगली. ( पी.पी.केस्तीकर )

दिनांक १३/०४/२०२३. मुख्य न्यायदंडाधिकारी, सांगली.